1) शाल्येय भांडार प्रमुख या नात्याने संबधित व्यक्तीला शाळेसाठी मागवलेल्या पुस्तकांवर अधिक सवलत देण्याविषयी विनंती पत्र***.***

४ डिसेंम्बर २०२१

प्रति,

मा. व्यवस्थापक,

अभि पुस्तकालय,

गाळा क्र. २

लातूर - ४१३५१२

विषय**:** पुस्तकावर अधिक सवलत देण्याबाबत.

महोदय ,

स.न.वि.वि.

आजच वर्तमानपत्रातून आलेले आपल्या पुस्तकालयाच्या वर्धापनदिनाबाबतचे पत्र वाचले. आणि आनंद झाला. वर्धापनदिनानिमित्त आपण पुस्तक खरेदीवर २०% सवलत जाहीर केली आहे.

आपले आनंद पुस्तकालय आणि आमची शाळा यांचे गेल्या अनेक वर्षाचे ऋणानुबंध आहे. गेली अनेक वर्ष आपण आमच्या शाळेला लागणारी सर्व प्रकार ची पुस्तके पुरवीत आला आहात.

सध्या पुस्तकांच्या किमती वाढल्या आहेत शाळेचे अनेक खर्च मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

शासनाकडून मिळणारे अनुदान वाढत्या खर्चाला पुरे पडत नाही. अली कडे देणग्या मिळणे सुद्धा जिकरीचे झाले आहे. म्हणून आपल्याला कळकळीची विनंती आहे की, आपण आपल्या वर्धापनदिनानिमित आमच्या शाळेला पुस्तक खरेदीवर २०% पेक्षा जास्त सवलत दयावी. आम्ही आमच्या पुस्तकाची यादी चार दिवसा आधी आपल्या कडे पाठवली आहे.

आपल्या अनुकूल प्रतिसादाची आम्ही वाट पाहत आहोत. सवलत वजा जाता येणारी देय रक्कम कृपया ई-मेल ने कळवावी म्हणजे ती रक्कम आम्ही आपल्या बँक खात्यात त्वरित जमा करू.

कळावे

आपला नम्र

अ.ब.क.

शालेय भंडार प्रमुख

श्री लाल बहादूर शास्त्री विद्यालय

जुना औसा रोड लातूर - ४१३५१२

ई-मेल: abc@gmail.com